आजचा दिनविशेष
१८६२ : मुंबई उच्च न्यायालयाची स्थापना.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र | वर्ष ३ रे | गुरवार १४ ऑगस्ट २०२५ | अंक २३६ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु



SUN Tourism International Pvt. Ltd. Since 2007 — All Tours घर से घर तक — दिल से दिल तक — www.suntourismpune.in

सन टुरिझम प्रस्तुत करते

देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय ग्रुप टूर्स !

आमच्या विशेष टूर पॅकेजेस

काश्मीर, वैष्णोदेवी, नैनीताल, शिमला, अयोध्या ग्रँड युरोप, ऑस्ट्रेलिया, जपान, दुबई, श्रीलंका व्हिएतनाम, सिंगापूर, थायलंड, बाली आता आपल्या स्वप्नांच्या सहलींची नोंदणी करा...

-: अधिक माहितीसाठी संपर्क :-
99222 22272 / 7602727555




### आता माघार नाही

मी मॅनेज होत नाही त्यामुळे माझ्यावर फडणवीस यांना हल्ला करायचा आहे, हे षडयंत्र आहे, असा आरोप त्यांनी केला. 27 ऑगस्ट रोजी अंतरवाली सराटी सोडणार आहे. मराठ्यांना आवाहन आहे की, त्यांनी दिसेल त्या मार्गाने मुंबईत दाखल व्हायचे आहे. यंदा माघार नाही, आरक्षण घेऊ आणि ओबीसीतूनच घेऊ, असे जरांगे पाटील म्हणाले

# एका पोराला जरी धक्का लागला तर संपूर्ण राज्य बंद करणार

## मनोज जरांगेंचा पाटलांचा सरकारला थेट इशारा

या 29 ऑगस्ट रोजी मराठा समाजाचा मोर्चा मुंबईत धडकणार आहे. मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण द्यावे आणि सगेसोयरे अध्यादेश लागू करावा या प्रमुख मागण्या आहेत. त्यासाठी मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी मुंबईत येण्याचे समाजाला आवाहन केले आहे. सध्या ते मराठवाड्यात संवाद दौरा करत आहेत. परभणीत माध्यमांशी बोलताना त्यांनी राज्य सरकारवर गंभीर आरोप करत इशारा पण दिला. परभणी येथील सावली विश्रामगृहात त्यांनी समाज बांधवांशी संवाद साधला. त्यावेळी त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर गंभीर आरोप केले. फडणवीस हे गोव्यात ओबीसी मेळाव्यासाठी गेले होते. त्यांनी तिथे जाऊन ओबीसी नेत्यांचे कान भरल्याचे ते म्हणाले. आंदोलनाच्या काळात राज्यात दंगल भडकवण्याचा डाव असल्याचे ते म्हणाले. मला याची कुणकुण लागल्याचे त्यांनी सांगितले. त्यांच्या या आरोपांमुळे एकच खळबळ उडाली आहे. तर महाराष्ट्र कायमचा बंदआमचं आंदोलन शांततेत होणार आहे. फडणवीस यांनी जर तसं काही करण्याचा प्रयत्न केला तर महाराष्ट्र कायम स्वरुपी बंद राहील. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनाही मोठा त्रास सहन करावा लागेल असा थेट इशारा मनोज जरांगे पाटील यांनी दिला. त्यांनी लक्ष्मण हाके यांच्यावरही गंभीर आरोप केले.लोकांमध्ये चर्चा आहे देवेंद्र फडणवीस षडयंत्र घालत आहेत, आधी चर्चा खोटी वाटत होती मात्र आता सिद्ध झाले. फडणवीस यांनी गोव्यामध्ये ओबीसी अधिवेशन घेतलं, आणि त्यांनीच तेथे सांगितलं मी ओबीसीसाठी लढणार, मग मराठा समाज साठी कोण लढणार, दलित मुस्लिम समाजाला तुम्हाला मतदान केलं नाही का, असा सवाल त्यांनी विचारला.

# गजानन विद्यालयात वृक्षास राखी बांधून रक्षाबंधन साजरा केला.

नवगण राजुरी दि. ( प्रतिनिधी):- येथील गजानन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात रक्षाबंधन निमित्त विद्यार्थ्यांनी वृक्षास राखी बांधून रक्षाबंधन साजरा केला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रशांत पवळ हे होते. प्राचार्यांच्या हस्ते संस्थेच्या संस्थापिका स्व.सौ.केशरकाकू क्षीरसागर व सरस्वती माता यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाला सुरवात करण्यात आली. यावेळी अध्यक्षीय स्थानावरून प्राचार्य प्रशांत पवळ यांनी विद्यार्थ्यांना भारतीय संस्कृतीतील रक्षाबंधना संदर्भात महत्व पटवून सांगितले. विद्यार्थ्यांनी याप्रसंगी आपले मनोगत व्यक्त केले.यावेळी उपमुख्याध्यापक शिंदे एस.एस. सह सर्व प्राध्यापक , शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जयदीप सरवदे यांनी तर आभार प्रदर्शन नितीन शिंदे यांनी केले.



# बीड येथे होणाऱ्या तिरंगा रॅलीमध्ये मोठया संख्येने सामील व्हावे -अप्पासाहेब झोडगे पाटील



(बीड प्रतिनिधी)ऑपरेशन सिंदूर च्या विजय यशानंतर भारताचे लोकप्रिय पंतप्रधान माननीय नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून संपूर्ण भारतात तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात येत आहे याच अनुषंगाने 14 ऑगस्ट 2025 रोजी सकाळी 9 वाजता बीड शहरामध्ये भव्य तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे ही तिरंगा रॅली महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळा पासून सुरु होऊन छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यापाशी समारोप होणार आहे तरी मोठया संख्येने नागरिकांनी या तिरंगा रॅली मध्ये सामील व्हावे अशे आवाहन भारतीय जनता पार्टीचे बीड तालुका सरचिटणीस आप्पासाहेब झोडगे पाटील यांनी केले आहे.

# सकाळी निवेदन दिले दुपारी प्रश्न लागला मार्गी

कडा (प्रतिनिधी) आष्टी तालुक्यातील साबलखेड कडा आष्टी रस्त्यांचे काम दोन वर्षांपासून चालू असून या रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी गटारी बनवतांना गटारीला पावसाचे पाणी जाण्यासाठी जागोजागी चार-चार इंचाची छिद्रे ठेवली होती.परंतु रस्ता बनवतांना ते सगळेच्या सगळे छिद्रे रस्त्यात बुजून टाकली. परिणामी दावलमलिक (शादवल) दर्गा समोर ५० फुटापेक्षा जास्त लांबीचे व २० फुटाच्या आसपास रूंदीत पावसामुळे कायमच चिखल - पाण्याचे ढव साचून राहत होते.त्यामुळे ये-जा करतांना कसरत करावी लागत होती.तर घसरून पडण्याची भिती, अपघाताची भिती यावर उपाययोजना करावी म्हणून सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार रहेमान सय्यद यांनी वेळोवेळी अभियंता भोपळे सह संबंधित अधिकारी कर्मचाऱ्यांना फोटो व्हिडिओ पाठवून संपर्क करून यावर लवकर उपाययोजना करावी म्हणून विनंत्या केल्या होत्या परंतु दखल घेतली नाही. म्हणून १२ ऑगस्ट २०२५ रोजी लेखी निवेदन देऊन आजपर्यंत दखल घेतली नाही याचा निषेध म्हणून १५ ऑगस्ट २०२५ शुक्रवार रोजी सकाळी ११:३० वाजता दर्गा समोर साचलेल्या चिखल-पाण्यात भोपळा,बेशरम घेऊन १५ मिनिंटे लोटांगण घेत निषेध व्यक्त करणार असल्याचे निवेदन १२ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता दिले

# टीसी न दिल्याने अकरावी प्रवेश हुकला – १५ ऑगस्टला उपोषण, शाळेला जिम्मेदार करण्याचा इशारा

## शासनाने मुदतवाढ दिली तरी शारदा इंग्लिश स्कूलची उदासीनता; विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळ

केज (प्रतिनिधी) : केज तालुक्यातील महादेव सोपान कराड यांचा मुलगा प्रतीक महादेव कराड हा शारदा इंग्लिश स्कूलमध्ये शिक्षण घेत होता. यावर्षी त्याने दहावीची परीक्षा यशस्वीरीत्या उत्तीर्ण केली असून, त्याचा अकरावी प्रवेश प्रमोद महाजन विद्यालय, केज येथे लागला होता. शासनाने प्रवेशाची अंतिम तारीख 8 ऑगस्टवरून 25 दिवसांपर्यंत वाढवली असतानाही, संबंधित शारदा इंग्लिश स्कूलने अद्यापपर्यंत टीसी (ट्रान्सफर सर्टिफिकेट) आणि मार्क मेमो विद्यार्थ्याला दिलेले नाही. परिणामी, प्रतीकचा प्रवेश होऊ शकलेला नाही. महादेव कराड यांनी स्पष्ट इशारा दिला आहे की, कागदपत्रे न मिळाल्यास व प्रवेश न झाल्यास शारदा इंग्लिश




स्कूल पूर्णपणे जिम्मेदार राहील. तसेच विद्यार्थ्याच्या भवितव्याचा प्रश्न मार्गी न लागल्यास ते 15 ऑगस्ट रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, बीड येथे उपोषणास बसणार आहेत. या प्रकरणामुळे स्थानिक नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत असून, शिक्षणाचा हक्क अबाधित ठेवण्यासाठी प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करावा, अशी मागणी होत आहे.

# भिमराव धुळप यांना राज्यस्तरीय “यशवंतराव चव्हाण पुरस्कार 2025” सन्मान

नवी मुंबई – सामाजिक, पत्रकारिता व रुग्णसेवा क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल धगधगती मुंबई चे संपादक भिमराव बाळकाबाई हिंदुराव धुळप यांना राज्यस्तरीय यशवंतराव चव्हाण पुरस्कार २०२५ ने गौरविण्यात आले. हा पुरस्कार नवी मुंबईतील घणसोली येथील महापालिकेच्या सभागृहात संपन्न झालेल्या सोहळ्यात महाराष्ट्र रिसर्च सेंटरचे संपादक व राजकीय विश्लेषक महेश म्हात्रे, विजय चोरमारे, विधानपरिषद आमदार विक्रम पाटील आणि भारत सरकारचे स्वतंत्र राज्यमंत्री दर्जाचे भरत नाना पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रदान करण्यात आला. आतापर्यंत महाराष्ट्रातील विविध संस्थांकडून २२ राज्यस्तरीय पुरस्कारांनी सन्मानित झालेल्या श्री. धुळप यांना हा २३ वा पुरस्कार मिळाला असून, आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार व पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या नावाने दिला जाणारा हा सन्मान त्यांच्यासाठी विशेष अभिमानाचा ठरला. यशवंतराव चव्हाण यांच्या विचारांनी व यशवंत नीतीने प्रेरित होऊन ते कार्यरत असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले आणि आयोजक यशवंतराव चव्हाण फाउंडेशनचे अध्यक्ष संजय सावंत व त्यांच्या टीमचे आभार मानले. सोहळ्यात विविध क्षेत्रात कार्यरत इतर मान्यवरांचाही सन्मान करण्यात आला. नागरिकांची मोठी उपस्थिती या गौरवक्षणाला साक्षी राहिली

# सकारात्मक इतिहासाच्या मांडणीतूनच राष्ट्राला गतवैभव प्राप्त होईल – डॉ. शरदराव हेबाळकर

माजलगाव प्रतिनिधी दिनांकसकारात्मक इतिहासाच्या मांडणीतूनच राष्ट्राला गतवैभव प्राप्त होईल असे प्रतिपादन अखिल भारतीय इतिहास संकलन योजनेचे माजी राष्ट्रीय महासचिव व ज्येष्ठ इतिहास तज्ञ डॉ. शरदराव हेबाळकर यांनी केले. श्री सिद्धेश्वर महाविद्यालय माजलगाव इतिहास विभाग, अखिल भारतीय इतिहास संकलन योजना, इतिहास संकलन संस्था महाराष्ट्र व इंडियन कौन्सिल ऑफ हिस्टॉरिकल रिसर्च नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर नेतृत्व, सामाजिक सुधारणा आणि सांस्कृतिक पुनर्जागरण या विषयावर आयोजित दोन दिवशीय राष्ट्रीय परिषदेच्या समारोपप्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते अध्यक्षस्थानी भा. शि. प्र. प्र.संस्थेच्या उपाध्यक्ष ज्योतीताई ठाकूर तसेच मंचावर स्थानिक शैक्षणिक संकुलाचे अध्यक्ष सुरेंद्र रेदासनी, कार्यवाह एडवोकेट विश्वास जोशी, महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष अभय कोकड, अर्थ समितीचे अध्यक्ष एकनाथ जाधव, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मुकुंद देवर्षी, संयोजक डॉ.गोरक्षनाथ फसले, डॉ केदारनाथ मालू, डॉ.रवी सातभाई, डॉ. धनंजय जवळेकर यांची उपस्थिती होती.

पुढे बोलताना डॉ. शरदराव हेबाळकर म्हणाले की, नकारात्मक इतिहासाच्या मांडणीमुळे मध्यंतरीच्या काळात भारतीयांचा आत्मविश्वास हा खालावलेला दिसून येत होता. परंतु अहिल्यादेवी सारख्या देशभक्त व स्वातंत्र्यसेनानींचा इतिहास तोही खरा इतिहास आपण जर समाजासमोर आणला तर आजची परिस्थिती बदलल्याशिवाय राहणार नाही. याप्रसंगी संशोधक प्राध्यापक व विद्यार्थी यांना त्यांनी इतिहासाविषयी विस्तृत असे मार्गदर्शन केले व काही काळापूर्वी खरा इतिहास हा बऱ्याच अंशी लपवला गेला होता पण इतिहास संकलन समिती हे समाजासमोर सत्य इतिहास आणण्याचे काम करते आहे. त्याबद्दल त्यांनी इतिहास संकलन समितीचे अभिनंदन केले.

अध्यक्ष समारोप करताना ज्योतीताई ठाकूर म्हणाल्या की, अहिल्यादेवी होळकरांचे कार्य आपण इंदोर या ठिकाणी जाऊन प्रत्यक्ष रूपाने जर पाहिले तर त्यांचा आदर्श पुढच्या पिढीला मार्गदर्शक ठरेल. त्या वातावरणात गेल्यानंतर खरोखरच आपल्याला त्यांचे कार्य पाहिल्यानंतर एक वेगळी ऊर्जा आपल्यामध्ये निर्माण होते व आपण देखील सकारात्मक काम करून समाजास वेगळ्या दिशेला नक्की नेऊ शकतो असे त्या म्हणाले.

या समारोप सत्रात डॉ. केदारनाथ मालू यांनी दोन दिवशीय राष्ट्रीय परिषदेत अन्नदान केल्यामुळे त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. व ऐतिहासिक शिल्पसृष्टी प्रदर्शनी लोकांसमोर साकारल्यामुळे श्री. सिद्धेश्वर विद्यालयातील सेवानिवृत्त शिक्षक श्री. उद्धव विभुते यांचा देखील विशेष असा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

याप्रसंगी स्थानिक कार्यवाह एडवोकेट विश्वास जोशी यांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले. ते म्हणाले की, या परिषदेला मिळालेला प्रतिसाद हा खरोखरच कौतुकास्पद आहे. स्वातंत्र्यासाठी आपले आयुष्य वेचलेल्या अशा काही दुर्लक्षित व्यक्तिमत्त्वांना अशा राष्ट्रीय परिषदेच्या माध्यमातून लोकांसमोर आणले जात आहे ही कौतुकाची बाब आहे. तसेच या कार्यशाळेविषयी सौ. वैशाली पुष्कर, सौ. बेबी घोरगे, श्री केदार वाघमारे यांनी कार्यशाळेच्या सकारात्मक आयोजनाबाबत मनोगते व्यक्त केली. तसेच या कार्यशाळेत उत्कृष्ट पेपर वाचन केल्याबद्दल सौ. बेबी घोरगे व सौ सुवर्णा बुरांडे दोन संशोधक विद्यार्थ्यांचा स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

या समारोप सत्राचे प्रास्ताविक संयोजक डॉ. गोरक्षनाथ फसले यांनी केले.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
संपादकः राहुल मारोतीराव वाईकर

गुरवार १४ ऑगस्ट २०२५
https://lokaarambh.com




सं पा द की य

## आत्मविश्वास,प्रयत्न व सातत्य म्हणजेच यश :

प्रत्येक व्यक्ती बालपणापासूनच वेगवेगळ्या गोष्टी शिकत असतो. या विविध गोष्टी शिकत असताना चांगले वाईट अनुभव येत असतात.या अनुभवांची शिदोरी गाठीशी बांधून प्रत्येक व्यक्ती आपला जीवनक्रम जगत असतो. चांगल्या अनुभवांचे संक्रमण पुढील पिढीकडे केले जाते. अशा चांगल्या अनुभवांची संक्रमण करण्याचे भाग्य मी एक शिक्षिका म्हणून मला जास्त प्रमाणात लाभले.कारण एक शिक्षक अनेक पिढ्या घडवण्याचे काम करत असतो. शिवाय विद्यार्थ्यांनी कसे वागावे,कसे बोलावे,यश कसे प्राप्त करावे याविषयी एक चांगला शिक्षक नक्कीच चांगले मार्गदर्शन करतो.

मी सन 2016 मध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पऱ्हाडवाडी या ठिकाणी बदलीने रुजू झाले. गावातीलच एक भाग शाळा, विद्यार्थी प्रगती जेमतेम,शाळेत भौतिक सुविधांचा अभाव अशा समस्या सोडवून शाळा व्यवस्थापन समितीच्या सहकार्यातून शाळा विकास करण्याचे ध्येय मनाशी बांधून कामाला लागले. लहानपणापासून आलेल्या अनुभवांचा वापर करून विद्यार्थी घडवण्याचे ठरवले. विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण केला. कोणतीही गोष्ट साध्य करण्यासाठी प्रयत्न करत राहायचे.यश मिळो अथवा अपयश मिळो सातत्यपूर्ण प्रयत्न करत राहायचे यश हमखास मिळतेच. या गोष्टी विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबवल्या. त्याची फलश्रुती पुढे दिसू लागली. पहिलीपासूनच विद्यार्थ्यांची उत्तम तयारी करून घेतली.विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला.प्रयत्नात कुठेही कमतरता राहिली नाही. सातत्यपूर्ण प्रयत्नामुळे शाळेतील अनेक विद्यार्थी विविध स्पर्धा परीक्षांमध्ये राज्य, जिल्हा गुणवत्ता यादीत येऊ लागले. अनेक विद्यार्थी जवाहर नवोदय परीक्षेत पात्र ठरले.चालू वर्षी सन 2024-25 च्या पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत माझे 2 विद्यार्थी राज्य गुणवत्ता यादीत तर 2 विद्यार्थी जिल्हा गुणवत्ता यादीत आले. शिवाय पुणे जिल्ह्यात प्रथम येण्याचा मानही माझ्याच विद्यार्थ्याला मिळाला याचा मला अभिमान आहे.

माझी शाळा सन 2022-23 साली 'अध्यक्ष चषक ' पुरस्कार प्राप्त ठरली. माझ्या सहकारी शिक्षिकेस सन 2023-24 रोजी चा 'जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार ' प्राप्त झाला. त्याच वर्षी रोटरी क्लबच्या वतीने मला 'नेशन बिल्डर अवॉर्ड ' प्राप्त झाला. शिवाय सन 2023-24 साली घेण्यात आलेल्या 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा ' या उपक्रमामध्ये आमच्या शाळेने दैदिप्यमान यश प्राप्त केले.दोन महिला शिक्षिका असून देखील अशा प्रकारे अनेकविध पुरस्कार आमच्या शाळेत प्राप्त झाले. परंतु हे सर्व यश प्राप्त झाले ते आत्मविश्वास,प्रयत्न व सातत्य या त्रिसूत्रीमुळेच.

**शब्दांकन : सौ.मनिषा विश्वास साकोरे उपशिक्षिका जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पऱ्हाडवाडी तालुका- शिरूर, जिल्हा- पुणे**

# ७५० वर्षांचा ज्ञानप्रकाश : आपेगावातून ( पैठण ) सुरू होणाऱ्या माउली महोत्सवाला राज्यभर आकार

. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींच्या ७५० व्या जयंतीनिमित्त आपेगाव , नेवासा , आळंदी , पंढरपूर आदी ठिकाणी वर्षभर विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे . सन २०२५ हे संत ज्ञानेश्वर महाराजांच्या सप्तशतकोत्तर सुवर्ण महोत्सवी ( ७५० वी ) जयंतीचे वर्ष आहे . ही जयंती १५ ऑगस्ट २०२५ रोजी , "गोकुळ अष्टमी"च्या दिवशी साजरी होईल . महाराष्ट्र शासनाने या वर्षी सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये "महोत्सव" स्वरूपात साजरा करण्याचे परिपत्रक काढले आहे . मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आदेशाने नगर विकास विभागाने हे आदेश जारी केले आहेत . स्थानिक स्वराज्य संस्था , शाळा-महाविद्यालये , वारी परंपरेशी जोडलेल्या संस्था , तसेच सांस्कृतिक संघटनांच्या सहभागातून कीर्तन-महोत्सव , ओवी-वाचन , स्वच्छता-सप्ताह , वृक्षारोपण , ग्रंथ-प्रदर्शने आणि युवकांसाठी निबंध-स्पर्धा , वक्तृत्व-स्पर्धा, पोस्टर-मोहिमा अशा कार्यक्रमांना सुरुवात होत आहे . या सोहळ्याचा केंद्रबिंदू म्हणून माऊलींची जन्मभूमी आपेगाव ता पैठण हे खास प्रकाशझोतात येत असून , नेवासामध्ये ज्ञानेश्वरी पठण आणि आळंदीत संजीवन-समाधी स्मरण सोहळे आयोजित केले जात आहेत . संत ज्ञानेश्वर यांचा जन्म इ.स. १२७५ ( शके ११९७) , आपेगाव—विठ्ठलपंत-रुक्मिणी दांपत्याच्या पोटी झाला. त्यांना भाऊ-बहिणी निवृत्तिनाथ , सोपानदेव , मुक्ताबाई हे होत . निवृत्तिनाथ यांनी नाथ संप्रदायातील गहिनीनाथ यांच्याकडून दीक्षा घेतली ; ज्ञानेश्वरांनी निवृत्तिनाथांनाच आपले गुरु मानले . इ.स. १२९० मध्ये संत ज्ञानेश्वर यांनी नेवासा येथे 'ज्ञानेश्वरी' ( भावार्थ-दीपिका ) रचली — हे भगवद्गीतेवरील मराठी टिपणग्रंथ , ओवीछंदात आहे . पुढे 'अमृतानुभव' ही तत्त्वज्ञानप्रधान कृति रचली . इ.स. १२९६ मध्ये आळंदी येथे संजीवन-समाधी घेतली . वारी - परंपरेतील आळंदी-पंढरपूर पालखी परंपरेचे केंद्रस्थान आहे . ज्ञानेश्वरांनी मराठीला धर्म-तत्त्वज्ञान व्यक्त करणारी समर्थ भाषा म्हणून प्रतिष्ठा दिली . ओवी या जनभाषेतील छंदात त्यांनी गीतेचे अर्थसुंदर रूप दिले ; यात लोकभाषा , उपमा-अलंकार , आणि तात्त्विक सूक्ष्मता यांचा अप्रतिम






संगम दिसतो . अमृतानुभव - मध्ये अद्वैत , आत्म-ब्रह्म ऐक्य , नाम-भक्ती आणि अनुभवप्रधान अध्यात्म यांचे सूक्ष्म विवेचन आढळते ; तर चांगदेव पासष्टी ही ६५ ओव्यांची उपदेशरूपी रचना नम्रता - अहंकारमुक्तीचा संदेश देते . चांगदेवाशी झालेल्या प्रसंगाचे वर्णन — " भिंतीवर आरूढ होऊन माउलींनी त्यांचा दर्प निववला "— वारकरी परंपरेत प्रसिद्ध आहे . संत ज्ञानेश्वर यांच्या जीवनातील महत्त्वाच्या घटना बाल्यावस्था : कुटुंबावर सामाजिक बहिष्कार ; तरीही चारही भावंडांमध्ये अध्यात्म-वैराग्याची ज्योत प्रज्वलित केली. नेवासा ( इ.स. १२९०) येथे गंगाकाठी प्रवरानदीच्या काठी ज्ञानेश्वरीचा अखंड नाम - स्मरणात झालेला प्रवाह ; माउली बोलतात , श्रोते लिहितात —सच्चिदानंद या शिष्यानं लेखन केल्याचा उल्लेख परंपरेतआहे . पैठण/चांगदेव प्रसंग : योगसिद्धीपेक्षा भक्ती-ज्ञानाचे श्रेष्ठत्व दाखवणारी 'भिंत चालली' ही लोककथा ; याच पार्श्वभूमीवर पासष्टी आहे . माऊलींनी आळंदी (इ.स. १२९६) येथे संजीवन-समाधी घेतली . संत ज्ञानेश्वर यांचे प्रमुख ग्रंथ पुढीलप्रमाणे आहेत . १ . ज्ञानेश्वरी (भावार्थ-दीपिका)— १८ अध्याय , गीतेचा लोकभाषेतील अर्थ यात आहे . करुणा , कर्तव्य , नामस्मरण आणि समत्व-योग यांचे सुलभ विवेचन यात आहे . २. अमृतानुभव — अनुभवप्रधान अद्वैत , 'कथनी'पेक्षा 'करणी'ला प्राधान्य ; शब्दापलीकडील अनुभूतीचा शोध यात घेतलेला दिसतो . ३.चांगदेव पासष्टी — अहंकारनिर्मूलन, विवेक-वैराग्य , सदाचार यांचा सार म्हणजे वरील ग्रंथ होय . वारकरी परंपरा, समाजप्रबोधन आणि आजचे संदर्भ :- माउलींच्या विचारांत समत्व , मैत्री , परस्पर-भाईबंदकी , सत्कर्माची आवड आणि सर्वकल्याणाचा ध्यास ठळकपणे येतो . वारीतील दिंडी , नामघोष , सामुदायिक श्रमदान , स्वच्छता यांचे सामाजिक-शैक्षणिक महत्त्व आज अधिकच प्रखर झाले आहे . पसायदान ही त्यांच्या विचारांची मूर्त प्रार्थना — धर्म-पंथांपलीकडचा मानवतावादी आशय—आजच्या सार्वजनिक जीवनाला दिशादर्शक ठरते . माउलींच्या निवडक 'ओव्या' (पसायदानातून ) - "आता विश्वात्मके देवे, येणे वाग्यज्ञे तोषावे ; तोषोनि मज द्यावे, पसायदान हे . " "जे खळांची व्यंकटी सांडो, तयां सत्कर्मी रती वाढो ; भूतां परस्परे जडो, मैत्र जीवांचे . " "दुरितांचे तिमिर जावो, विश्व स्वधर्म सूर्ये पाहो; जो जे वांछील तो ते लाहो , प्राणिजात. " "वर्षत सकळ मंगळी , ईश्वरनिष्ठांची मांदियाळी ; अनवरत भूमंडळी, भेटतु भूतां . " "चलां कल्पतरूंचे आरव, चेतना चिंतामणींचे गाव; बोलते जे अर्णव, पीयूषाचे . " "चंद्रमे जे अलांच्छन, मार्तंड जे तापहीन; ते सर्वांही सदा सज्जन, सोयरे होतू . " ७५० वी जयंती : काय-काय विशेष ? १५ ऑगस्ट रोजी जन्मभूमी आपेगांव -आळंदी - नेवासा जोडणारी ' ज्ञानयात्रा ' : ग्रंथ व हस्तलिखित प्रतिकृतींचे प्रदर्शन , प्रवचनमाला असेल . विद्यार्थी उपक्रम : 'ओवी बोला—ओवी लिहा', हस्ताक्षर-स्पर्धा , ' ज्ञानेश्वरीतलं विज्ञान ' विषयक प्रात्यक्षिके होतील . सामुदायिक सेवा जसे की नदी-स्वच्छता , वृक्षारोपण , हरित-दिंडी , रक्तदान शिबिरे घेतली जातील . कीर्तन-महोत्सव होतील. वारी परंपरेतील कीर्तनकार , भजन-मंडळे , दिंडी-नृत्य, भारूड यांचे सादरीकरण होणार आहे . का वाचावी 'ज्ञानेश्वरी'? - भाषेची आपुलकी वाढवणारी प्रत्यक्ष जीवनातील उदाहरणांनी समजावलेला कर्म - भक्ती -ज्ञान -योग— अगदी आजच्या विद्यार्थ्यांपासून तरुण व्यावसायिकांपर्यंत सर्वांसाठी वाचनीय आहे म्हणून वाचावी . ही लोकशिक्षणाची परंपरा आहे . ग्रंथाभोवती उभा राहिलेला वाचन-सप्ताह , पारायण , कीर्तन यांचा लोकशाही स्वरूपाचा अभ्यासक्रम आहे . यातून मानवतावाद वाढतो . 'मी-तू' भेद निववून मैत्र , सत्कर्म , सर्वकल्याण यांचा आग्रह पसायदानात आहे. शेवटची समर्पक आठवण :- माउलींच्या ७५० व्या जयंतीचा उत्सव केवळ धार्मिक नाही ; तो भाषा-संस्कृती -मानवतेचा महोत्सव आहे . प्रत्येक शाळा , ग्रामसभा , संस्था आणि घराघरांत 'ओवी-वाचन' सुरू झाले तरच ही जयंती खऱ्या अर्थाने उजळेल . "किंबहुना सर्व सुखी..." या माउलींच्या सार्वत्रिक आशीर्वादात आजचा महाराष्ट्रही सामील होवो

**चंद्रकांत सरस्वती प्रकाश शेळके**
**तहसीलदार, बीड .**

# संभाजी ब्रिगेड जिल्हाध्यक्षपदी सुभाष कोल्हे,कमलेश कदम,जेजेराव शिंदे लोकसभा अध्यक्ष पदी परमेश्वर पाटील तर महानगराध्यक्ष पदी अशोक कदम

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : संभाजी ब्रिगेड जिल्हाध्यक्ष,लोकसभा अध्यक्ष,महानगराध्यक्ष पदाच्या निवडी पुणे येथे पंडित जवाहरलाल नेहरू सांस्कृतिक सभागृहात दि.१२-ऑगस्ट रोजी करण्यात आल्या यावेळी नांदेड दक्षिण सुभाष कोल्हे,उत्तर कमलेश कदम,ग्रामीण मध्य जेजेराव शिंदे याच्याकडे जिल्हाध्यक्ष पदाचा पदभार देण्याण आला,लोकसभा अध्यक्ष पदी परमेश्वर पाटील,महानगराध्यक्ष पदी अशोक कदम यांची निवड संभाजी ब्रिगेड प्रदेशाध्यक्ष मनोज आखरे व संभाजी ब्रिगेड प्रदेश महासचिव सौरभ खेडेकर यांच्या स्वाक्षरीने नियुक्ती पत्र देऊन करण्यात आले.

जिल्हाध्यक्ष पदासाठी मंगळवार ११- जुन रोजी शासकीय विश्रामगृह नांदेड येथे मुलाखती झाल्या संभाजी ब्रिगेड केंद्रीय कार्यकारिणी



सदस्य तथा नांदेड जिल्हा संपर्कप्रमुख उमाकांत उफाडे,संभाजी ब्रिगेड विभागीय अध्यक्ष संकेत पाटील यांनी मुलाखती घेतल्या होत्या.

नांदेड दक्षिण, उत्तर , ग्रामीण मध्य, महानगराध्यक्ष पदासाठी अनेकांनी मुलाखती दिल्या होत्या त्यात दक्षिण जिल्हाध्यक्ष पदासाठी संभाजी ब्रिगेड मध्ये गत अनेक वर्षांपासुन कार्यरत असलेले वरिष्ठांनी दिलेली जबाबदारी तंतोतंत पेलणारे सुभाष कोल्हे यांची, उत्तर जिल्हाध्यक्ष पदी संभाजी ब्रिगेड च्या विविध पदावर कार्यरत असलेले राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातुन संभाजी ब्रिगेड मध्ये प्रवेश केलेल्या कमलेश कदम यांची, संभाजी ब्रिगेड देगलुर तालुकाध्यक्ष पदावर कार्यरत असलेले जेजेराव शिंदे यांची ग्रामीण मध्य जिल्हाध्यक्ष पदी, महानगराध्यक्ष पदी अशोक कदम, लोकसभा अध्यक्ष पदी उत्तर जिल्हाध्यक्ष पदावर कार्यरत असलेल्या परमेश्वर पाटील यांची तर मध्य जिल्हाध्यक्ष पदावर कार्यरत असलेल्या भगवान कदम यांची विभागीय कार्याध्यक्ष पदावर निवड पुणे येथे झालेल्या पद नियुक्ती समारंभ कार्यक्रमात संभाजी ब्रिगेड प्रदेशाध्यक्ष ॲड मनोज आखरे, महासचिव सौरभ खेडेकर, मुख्य प्रवक्ते गंगाधर बनबरे,कार्याध्यक्ष सुधीर देशमुख, प्रदेश संघटक तथा संपर्क प्रमुख उमाकांत उफाडे, विभागीय अध्यक्ष संकेत पाटील यांच्या उपस्थितीत करण्यात आली. या निवडीमुळे नांदेड जिल्हयामधे संभाजी ब्रिगेड चे कार्य पहिल्यापेक्षाही वाढणार हे चित्र दिसुन येत आहे.संपुर्ण नांदेड जिल्हयाचे लक्ष या निवडी कडे लागले होते.अनेक मात्तबरांनी मुलाखती दिल्या असल्यामुळे निरीक्षकांची खुप तारांबळ उडाली हेही तेवढेच खरे. नुतन विभागीय कार्याध्यक्ष, लोकसभा अध्यक्ष, जिल्हाध्यक्ष,महानगराध्यक्षांचे सर्व स्तरातून स्वागत होत आहे.

# विविध मुद्द्यांवर शे.का.प, शिवसेना (उबाठा) आणि राष्ट्रीय कॉंग्रेसच्या वतीने तिव्र अंदोलनाचा इशारा

पाटोदा (प्रतिनिधी)- पाटोदा तालुक्यातील विविध विकासात्मक मुद्द्यांवर लक्ष केंद्रित करत विविध विरोधी पक्षांच्या नेत्यांनी पाटोदा उपविभागीय अधिकारी यांना खालील मुद्द्यांबाबत निवेदन देण्यात आले. पाटोदा येथील ग्रामीण रुग्णालयाला उपजिल्हा रुग्णालयाची मंजुरी देणे, शेतकऱ्यांची संपूर्ण कर्ज मुक्ती करणे, २०२३ सालातील सतत पावसाच्या खंडामुळे आणि २०२४ सालातील सततच्या पावसामुळे शेतकऱ्याचे खरीप पिकांचे झालेले नुकसान त्यावर विमा कंपनीकडून झालेल्या नुकसानीच्या किती टक्के व कोणकोणत्या पिकासाठी मंजूर केला तो अद्याप मिळाला नाही त्याची सखोल चौकशी करून तो शेतकऱ्यांच्या खात्यावर वर्ग करण्यात यावा, पाटोदा येथील जिल्हा परिषद हायस्कूल शाळा चालु करण्यात यावी, मांजरा नदीवरील अधुऱ्या अवस्थेत असलेला ब्रिज कम को.प. बंधारा पूर्ण करण्यात यावा, संजय गांधी योजनेसाठी २१००० /- हजाराच्या उत्पन्नाची अट शिथील करण्यात यावी, दारिद्रय रेषेचा पुन:सर्वे करण्यात यावा, निराधार योजनेत किमान ५००० /- रुपये वेतन देण्यात यावे, आतंक वाद्यांच्या नावाखाली सामान्य जनतेच्या अधिकारावर बंधन घातलेले जन सुरक्षा विधेयक रद्द करण्यात यावे, देशात गाजत असलेले मतचोरी प्रकरण भारतीय लोकशाहीला काळीमा फासणारे आहे, त्यावर योग्य कार्यवाही करण्यात यावी, पाटोदा तालुक्यातील संजय गांधी / श्रावणबाळ योजनेच्या फाईल (अर्ज) तात्काळ निकाली काढण्यात याव्यात, पाटोदा ग्रामीण रुग्णालय ते शंभर चिरा रस्ता, पाटोदा ते साकत हद्दीपर्यंत रस्ता या बोगस कामाची आणि पाटोदा ते स्मशानभूमी रस्त्यावरील मांजरा नदीवरील पूल वाहून गेला आहे याची राज्य पातळीवरील विशेष पथकाकडून चौकशी करून अधिकारी व संबंधित एजन्सीवर शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी फौजदारी गुन्हे दाखल करण्यात यावेत. या वेळी शे.का.प.चे जिल्हा चिटणीस भाई विष्णुपंत घोलप, भागवत नागरे, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस चे तालुकाध्यक्ष राहुल जाधव, राहुल नागरगोजे, ॲड.विशाल मस्के तसेच शिवसेना उबाठा पक्षाचे तालुका प्रमुख मुकुंद शिंदे, युवासेना प्रमुख अजिंक्य डोरले, शिवसेना शहर प्रमुख सोमनाथ लवूळ, सचिव आकाश कांकरिया, अल्पसंख्याक सेल प्रमुख मुन्ना शेख, अजय डोरले हे उपस्थित होते. सदरील मागण्या मान्य झाल्या नाहीत तर लवकरच सर्व पक्षीय तीव्र आंदोलनाचा ईशारा देखील देण्यात आला.



## धैर्य, आत्मविश्वास आणि परिश्रम यशस्वी जीवनाचे तीन आधारस्तंभ

**लेख : संजय पाटील, एस्सेनेट टेक्नॉलॉजीज, नाशिक**

जीवनात यश मिळवणे ही प्रत्येकाची स्वप्ने असतात. पण हे स्वप्न फक्त इच्छा व्यक्त करून पूर्ण होत नाही, तर त्यासाठी ठोस कृती, सातत्य आणि मनाची तयारी आवश्यक असते. यशाच्या मार्गावर अनेक अडथळे, संकटे आणि आव्हाने येतात. अशा वेळी धैर्य, आत्मविश्वास आणि परिश्रम या तीन गुणांचा संगमच आपल्याला पुढे नेतो. हे गुण जन्मतः नसतात, तर सततच्या अनुभवातून आणि प्रयत्नातून विकसित होतात. जेव्हा मनात या तीन गोष्टींचा दृढ पाया तयार होतो, तेव्हा कोणतीही शिखरे गाठणे अशक्य राहत नाही. धैर्य म्हणजे फक्त भीती नसणे नाही, तर भीती असूनही कृती करण्याची क्षमता होय. अनेकदा अपयशाची शक्यता दिसली की माणूस मागे हटतो. पण खरा धैर्यवान तोच, जो अपयशाचा धोका पत्करूनही प्रयत्न करत राहतो. धैर्य हे प्रत्येक निर्णयामध्ये आपल्याला बळ देते. जीवनातील प्रत्येक कठीण प्रसंगी धैर्य टिकवले, तर आपण कुठल्याही परिस्थितीत हार मानत नाही. हीच वृत्ती आपल्याला पुढे नेत राहते आणि इतरांना प्रेरणा देते. त्यामुळे यशाचा पाया घालायचा असेल, तर धैर्याचा दगड प्रथम ठेवावा लागतो. आत्मविश्वास हा यशाचा खरा इंधन आहे. स्वतःच्या क्षमतांवर विश्वास नसल्यास मोठी उद्दिष्टे गाठणे अशक्य होते. आत्मविश्वासामुळे आपण आव्हानांकडे सकारात्मक दृष्टीने पाहतो आणि भीती न बाळगता कृती करतो. तो आपल्याला आपल्या सामर्थ्यांची जाणीव करून देतो. आत्मविश्वास नसलेला व्यक्ती संधीसमोर घाबरतो, तर आत्मविश्वास असलेला ती संधी सोनेरी बनवतो. त्यामुळे यशाच्या मार्गावर आत्मविश्वास हा नेहमी आपल्या सोबत असावा. ही शक्ती आपल्या बोलण्यात, वागण्यात आणि निर्णयक्षमतेत दिसून यावी, तेव्हाच तिचा परिणाम होतो. परिश्रमाशिवाय यश ही केवळ कल्पना असते. कितीही धैर्य आणि आत्मविश्वास असला, तरी मेहनतीशिवाय त्यांचा उपयोग मर्यादित राहतो. परिश्रम म्हणजे फक्त शारीरिक मेहनत नव्हे, तर बुद्धी, वेळ आणि ऊर्जा यांचा योग्य वापर. सततचा अभ्यास, नियोजन आणि कृती यामुळेच परिश्रमाचे फळ गोड लागते. इतिहासातील प्रत्येक यशस्वी व्यक्तीच्या आयुष्यात मेहनतीचा मोठा वाटा आहे. म्हणूनच “मेहनत हीच भाग्याची जननी” असे म्हटले जाते. योग्य दिशेने केलेला परिश्रमच यशाकडे नेणारा खरा पूल असतो. धैर्य, आत्मविश्वास आणि परिश्रम या तिन्ही गुणांचा संगम झाला की चमत्कार घडतो. फक्त एकच गुण असेल, तर यश अपूर्ण राहते. धैर्य असून आत्मविश्वास नसेल, तर भीती जिंकता येत नाही. आत्मविश्वास असून परिश्रम नसेल, तर स्वप्न साकार होत नाही. परिश्रम असून धैर्य नसेल, तर अडचणीत आपण थांबतो. म्हणूनच यशस्वी होण्यासाठी या तिन्ही गुणांचा संतुलित वापर आवश्यक आहे. हे तीन आधारस्तंभ एकत्र उभे राहिले कीच आपले यशाचे घर मजबूत होते आणि काळाच्या कसोटीत टिकते. यशाच्या प्रवासात पहिलं पाऊल म्हणजे धैर्याने सुरुवात करणे. सुरुवातीला परिस्थिती प्रतिकूल असते, लोक आपल्यावर हसतात किंवा शंका घेतात. पण अशा वेळी हार न मानता आपलं ध्येय नजरेसमोर ठेवणं गरजेचं असतं. धैर्यामुळे आपण पहिला प्रयत्न करतो आणि त्या पहिल्या पावलातूनच पुढील संधी जन्माला येतात. जीवनात ज्या लोकांनी महान कार्य केलं, त्यांनी सुरुवात करताना अनेक अडचणींचा सामना केला. तरीही त्यांनी धैर्याचा त्याग केला नाही. याच वृत्तीमुळे त्यांनी अशक्याला शक्य केलं. आत्मविश्वासाची खरी कसोटी अपयशाच्या वेळी लागते. यश आल्यावर आत्मविश्वास टिकवणं सोपं असतं, पण अपयशाने खचून न जाता पुन्हा उभं राहणं कठीण असतं. आत्मविश्वासामुळेच आपण चुका शिकण्याच्या संधी म्हणून पाहतो. स्वतःवरचा विश्वास हरवला, तर पुढची पायरी चढता येत नाही. म्हणूनच प्रत्येक वेळी स्वतःला आठवावं की “मी हे करू शकतो”. ही एकच भावना आपल्याला अशक्य वाटणाऱ्या गोष्टी साध्य करण्यास प्रवृत्त करते. आत्मविश्वास म्हणजे आपल्यातील शक्तीला सतत जागं ठेवणं होय. परिश्रमाचा प्रवास हा सततचा असतो. यश मिळाल्यानंतरही मेहनत थांबवली, तर आपण मागे पडतो. जगात तग धरण्यासाठी सातत्याने शिकत राहणं, स्वतःला सुधारत राहणं आणि मेहनत करत राहणं आवश्यक आहे. परिश्रमात शिस्त आणि वेळेचं व्यवस्थापन महत्त्वाचं असतं. अकारण काम न करता, योग्य वेळी योग्य प्रयत्न करणं ही खऱ्या परिश्रमाची खूण आहे. मेहनतीचा मार्ग कठीण असला, तरी शेवटी त्याचाच गोड फलित मिळतं. यश मिळाल्यानंतर त्याला टिकवण्यासाठीही परिश्रम तितकेच आवश्यक असतात. धैर्यामुळे आपण आव्हानांना घाबरत नाही, आत्मविश्वासामुळे आपण त्यांना जिंकण्याची क्षमता ओळखतो आणि परिश्रमामुळे त्या आव्हानांना हरवतो. हे तीन गुण एकत्र आले की कोणतेही ध्येय दूर राहत नाही. हे गुण फक्त वाचनातून किंवा ऐकण्यातून मिळत नाहीत, तर प्रत्यक्ष कृतीतून, अनुभवातून आणि संघर्षातून येतात. म्हणूनच या तिन्ही गुणांना आपल्या दैनंदिन आयुष्यात रुजवणं आवश्यक आहे. सुरुवातीला हे अवघड वाटेल, पण सातत्याने प्रयत्न केल्यास हे गुण आपल्या स्वभावाचा अविभाज्य भाग बनतात. यशस्वी होण्यासाठी प्रेरणा सतत मिळत राहणं गरजेचं आहे. धैर्य वाढवण्यासाठी प्रेरणादायी कथा वाचा, आत्मविश्वासासाठी सकारात्मक लोकांच्या सहवासात राहा आणि परिश्रमासाठी वेळेचं काटेकोर नियोजन करा. या तीन गोष्टींचा सराव केल्यास आपल्या जीवनात हळूहळू सकारात्मक बदल दिसू लागतात.

# तलवाडा पोलीस स्टेशनच्या हाद्दीत तलवारीने केक कापणाऱ्या ऐकास पोलीसांनी केले अटक

गेवराई प्रतिनिधी ÷गेवराई तालुक्यातील तलवाडा पोलीस स्टेशनच्या हाद्दीत आणेक गुन्हेगारी प्रवृत्या वावरत आसल्याचे आणेकदा ऐकावयास मिळते. पण कुणाशी वैर का पतकारावे या भावनेने तक्रारदार पुढे येत नसले तरी आता तलवाडा पोलीस स्टेशनला गुन्हेगाराचे गर्दनकाळ आसे सपोनी मनोज निलंगेकर सारखे आधिकारी व तेवड्याच निडरतेचा स्टॉफ तलवाडा पोलीस स्टेशनला लाभल्याचा प्रतय नुकताच तलवाडा करांना आला आहे. त्याचे झाले आसे की दि.११/८/२०२५ रोजी पोलीस ठाणे तलवाडा येथील अधिकारी/अंमलदार यांना प्रसार माध्यामाच्या व्हाटस्पवर आरोपी नामे बिलाल



मुन्शि शेख रा. राजापुर ता. गेवराई जि. बीड याने त्याचे नातेवाईकाच्या लहान मुलाच्या वाढदिवसा निमित्त हातात एक लोखंडी तलवार घेवुन फोटो व्हायरल झाल्याची खात्री लायक माहिती मिळाली त्यावरुन पोलीस ठाणे तलवाडा येथील अधिकारी/अंमलदार यांनी बिलाल मुन्शि शेख रा. राजापुर ता. गेवराई जि.बीड याचे राहते घरी जावुन झडती घेतली असता त्याच्या घरात एक धारदार तलवार मिळुन आल्याने ते जप्त करुन नामे बिलाल मुन्शि शेख वय २२ वर्ष रा. राजापुर ता. गेवराई जि.बीड यांचे विरुध्द गुन्हा दाखल करुन त्यास अटक केली. या घटने वरुन आसे दिसुन आले की सध्या तलवाडा पोलीस स्टेशन येथे कार्यरत सपोनी मनोज निलंगेकर व त्यांचे सहकारी व्यक्तिगत देखील सोशल मीडियावर लक्ष ठेऊन आहेत. व्हाटस्पवर निदर्शनास आलेली बाब दुर्लक्षित न करता संबंधित आरोपीच्या घरी जाऊन लागलीच झडती घेत तलवार जप्त करत आरोपीला अटक करुन त्यांच्यावर तात्काळ कार्यवाही केली. सदरची कामगिरी मा. पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत, मा. सहायक पोलीस अधीक्षक श्री. सचिन पांडकर, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. निरज राजगुरु, पोलीस ठाणे तलवाडा प्रभारी अधिकारी सपोनि श्री. मनोज निलंगेकर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस ठाणे तलवाडा येथील पोउपनि/स्वप्निल कोळी, पोह/नारायण काकडे, पोह/मोहसीन शेख, पोअं/अमोल अवसरमल यांनी केली.

# आजच्या तिरंगा रॅली मध्ये सर्व बीड शहरातील जनतेने सहभाग नोंदवावा – अशोक लोढा

**भारतीय स्वातंत्र्यदिन आणि पहलगाम हल्ल्याचा बदला घेऊन भारतीय लष्कराने पाकिस्तानी आतंकवाद्यांच्या विरोधात ऑपरेशन सिंदूर अभियान राबवून आतंकवाद्यांच्या भ्याड हल्ल्याचा सामना केला व त्यांचा समूळ नायनाट करण्याचे काम भारतीय सैनिकांनी केले आहे. आतंकवादयांचे मनसुबे उध्वस्त करत त्यांच्या मुस्क्या आवळणाऱ्या आपल्या शूरवीर भारतीय जवानांच्या गौरवार्थ त्यांना मानाचा मुजरा आणि नतमस्तक होऊन त्यांनी केलेल्या कामगिरीचे कौतुक आणि अभिनंदन म्हणून स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधत बीड शहरांमध्ये तिरंगा रॅलीचे आज आयोजन करण्यात आले आहे. या रॅलीत देश प्रेमी नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन भाजप नेते अशोक लोढा यांनी केले आहे. आपल्या राष्ट्र च्या कल्याणासाठी राष्ट्रप्रेमाचा संकल्प पुन्हा एकदा दृढ करूया. देशाचा विकास, सुरक्षा व देशवासीयांच्या कल्याणासाठी नेहमी समर्पित राहण्याची प्रतिज्ञा घेऊया. मागील इतिहास पाहता स्वतःच्या प्राणाची चिंता न करता देशासाठी प्राणाचे बलिदान**



**देण्यास कधीही तयार असतात. अशा या सैनिकांच्या सन्मानार्थ आजच्या रॅलीमध्ये सर्व पदाधिकारी, सर्वसामान्य नागरिकांनी सहभागी व्हावे. ही रॅली सकाळी ९:३० वा. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे पुतळ्यापासून – सुभाष रोड साठे चौक ते छ.शिवाजी महाराज यांचे पुतळ्यापर्यंत असणार आहे. या रॅलीच्या माध्यमातून राष्ट्रभक्ती आणि राष्ट्रोद्धाराची चेतना जागृत करत भारतीय स्वातंत्र्याच्या महायज्ञात उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवत या रॅलीमध्ये सहभागी होऊन देशभक्ती व राष्ट्रभक्तीची चेतना जागृत करावी असे आवाहन अशोक लोढा यांनी केले आहे.**

# विहामांडवा येथे अहिल्यादेवी होळकर व संत भगवान बाबा पुण्यतिथी जयंती साजरी

पैठण ।प्रतिनिधी पैठण तालुक्यातील विहामांडवा येथे सरस्वती ग्रंथालय व सार्वजनिक वाचनालयामध्ये महान संत भगवान बाबा यांची जयंती व राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची (२३०) वी. पुण्यतिथी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी प्रथम राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर व भगवान बाबा यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून पुण्यतिथी व जयंती मोठ्या उत्साहाने सर्व समाज बांधव व भगवान बाबा भक्तगण यांची यावेळी उपस्थिति दर्शवली होती. यावेळी गावातील नागरिकांनी पुण्यतिथी स्थळी उपस्थिति लावली होती. ज्येष्ठ



शिक्षक बबनराव नवपुते सर यांनी प्रस्तावना केली. व्यापारी महासंघाचे राजेंद्र पन्हाळकर यांनी विचार मांडले तर वाचनालयाचे अध्यक्ष राजेंद्र देशमाने सर यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले, यावेळेस गावातील अनेक मान्यवर उपस्थित होते त्यामध्ये व्यापारी कैलास भाऊ नवपुते, प्रकाश जोशी, मनोज वाव्हळ, सुभाष पवार, नरेंद्र हुंडीवाले, सुभाष आवारे, सुखदेव होटकर, आयाज पठाण,प्रकाश जोशी, मनोज वाव्हळ, सुभाष पवार, नरेंद्र हुंडीवाले, सुभाष आवारे, सुखदेव होटकर, आयाज पठाण, दादासाहेब रोडगे, विकास काजळे , राजू सोनटक्के, दगडू अण्णा झुंजे, रवींद्र देशमाने, हरिभाऊ हाकम, सुभाष भाऊ ताडे, दिनकरराव राजे निंबाळकर, अरुण नाना तुपकरी, तीर्थराज हाकम, दादा नवपुते, दादासाहेब हातमोडे, सतीश शिंदे हिंगणी, चंद्रकांत लंबे, बबनराव नवपुते सर, संदीप साठे, राजेंद्र गाभूड इतर मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संभाजी ब्रिगेडच्या बीड जिल्हाध्यक्षपदी प्रा.शशिकांत कन्हेरे यांची निवड

आष्टी (प्रतिनिधी) संभाजी ब्रिगेडच्या बीड जिल्हाध्यक्षपदी सामाजिक कार्यकर्ते, संभाजी ब्रिगेडची मुलूख मैदानी तोफ प्रा. शशिकांत कन्हेरे यांची नियुक्ती प्रदेशाध्यक्ष ड. मनोज आखरे व महासचिव सौरभ खेडेकर, प्रदेश प्रवक्ते गंगाधर बनबरे व सर्व प्रदेश कार्यकारिणीच्या उपस्थितीत त्यांना नियुक्ती पत्र पुणे येथील पंडीत जवाहरलाल नेहरू सांस्कृतिक सभागृहात जिल्हा अध्यक्ष पदगृहन सोहळ्याच्या कार्यक्रमात फेर निवड करण्यात आली आहे. सामाजिक कार्यात सतत अग्रेसर राहणा-या प्रा. कन्हेरे यांची पुन्हा बीड जिल्हाध्यक्षपदी फेरनिवड झाल्याने बीड जिल्ह्यात आनंद व्यक्त केला जात आहे. मराठवाडासह बीड जिल्ह्यात संभाजी ब्रिगेडचा विचार सर्वदूर पोहोचविलेला आहे. प्रा. शशिकांत कन्हेरे यांनी सामाजिक बांधिलकी मानून केलेले कार्य तसेच ते अनेक वर्षांपासून पुरोगामी चळवळीत सक्रिय आहेत. त्यांची सामाजिक व राजकीय वाटचाल या सर्व कार्याची दखल घेऊन संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष ड. मनोज आखरे यांनी प्रा. शशिकांत कन्हेरे यांची पुन्हा एकदा बीड जिल्हाध्यक्षपदी फेरनिवड करून त्यांना शुभेच्छा दिल्या. दरम्यान आपल्या निवडीविषयी आभार मानून बोलताना प्रा. शशिकांत कन्हेरे यांनी सांगितले की, संभाजी ब्रिगेडचे संघटन वाढीवर भर देणार आहोत. समाजातील प्रश्न सोडविणार आहोत. तसेच सामान्य माणसांवर होणा-या अन्याय अत्याचारा विरूद्ध लढण्यासाठी संभाजी ब्रिगेडच्या माध्यमातून २४ तास जनसेवेसाठी उपलब्ध असेल असे नवनिर्वाचित बीड जिल्हाध्यक्ष प्रा. शशिकांत कन्हेरे यांनी सांगितले.

# धुमाळे यांच्या ओरखडे कविता संग्रहाचा प्रकाशन सोहळा संपन्न

नाशिक:- पुस्तकांच्या हॉटेलमध्ये भरले पलपब प्रकाशनाचे पाचवे राज्यस्तरीय भव्य दिव्य काव्य संमेलन १० ऑगस्ट २०२५ रोजी या कार्यक्रमात सातारचे कवी संजीवकुमार धुमाळे यांच्या “ओरखडे” या काव्य संग्रहाचा या मान्यवरांच्या हस्ते भव्य दिव्य सोहळा संपन्न ,कवी धुमाळे आपल्या भाषणात बोलले माझ्या आयुष्यातील अनुभवातून हा कविता संग्रह मी लिहिला आहे.व जगप्रसिद्ध आजीबाईचं पुस्तकांचे हॉटेल याठिकाणी पलपब प्रकाशन यांच्या राज्यस्तरीय काव्य संमेलनाच्या व्यासपीठावर सौ.लीना ताई पाटील व इतर मान्यवर यांच्या हस्ते हा प्रकाशन सोहळा होत आहे ही माझ्यासाठी सर्वात आनंदाची गोष्ट आहे.या सग्रहासाठी प्रस्तावना कवी, लेखक किरण तोडकर सुर्यवंशी यांनी दिली व लीना ताई,कवी प्रतीक मतकर सर , कवी किरण तोडकर सरांचा यात फार मोठा वाटा आहे . माझ्या स्वर्गीय पत्नीचे व माझे स्वप्न आज पूर्ण झाले हे बोलून कवी धुमाळे सरांनी सर्वांचे आभार मानले. .काव्य संमेलनामध्ये ६० कवी , कवयित्री यांचा सहभाग होता. तसेच रसिक श्रोत्यांची देखील खुपच मांदियाळी होती . या संमेलनाची सुरुवात पाहुण्यांच्या औक्षणाने आणि ग्रंथ पूजन करून झाली कार्यक्रमाच्या सुरुवातीलाच कवी संजीवकुमार धुमाळे यांच्या ओरखडे या काव्य संग्रहाचा प्रकाशन सोहळा करण्यात आला या सर्व मान्यवरांच्या उपस्थितीत या प्रसंगी लीना ताई पाटील



वृषाली वानखेडे यांनी आपल्या भाषणात कवी धुमाळे व त्यांच्या ओरखडे या कविता संग्रहाचे भरभरून कौतुक करून शुभेच्छा दिल्या. संमेलनाध्यक्ष म्हणून मा.सौ. भिमाबाई जोंधळे, उद्घाटक मा.लेखिका सेजल पाटील,मा.धीरज पाटील,प्रमुख पाहुणे मा.सुहास टिपरे मा.सौ.वृषाली वानखेडे, मा.अविनाश पाटील, विशेष उपस्थिती मा.सुहास राऊत, सौ.कवयित्री सुरक्षा पाटील, स्वागताध्यक्ष मा. लेखिका,अश्विनी सांगळे , आयोजक मा.सौ. लीना ताई पाटील हे मान्यवर उपस्थित होते. सुत्रसंचालन वैशाली सोनवणे, मा.गायत्री खोकले , मा.राजरत्न वाहूळ यांनी केले मा. सिद्धार्थ पाटील,मयूर सांगळे,मा .प्रकाश बारी, पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष संदीप पवार सर यांची ही खास उपस्थिती होती . पलपब सर्वेसर्वा सौ.लीना ताई पाटील, पलपब महाराष्ट्र अध्यक्ष कवी किरण तोडकर सुर्यवंशी, यांच्या मार्गदर्शनाखाली नियोजन वेळेत हे राज्यस्तरीय २०२५ श्रावणधारा काव्य संमेलन उत्साहात पार पडले, शेवटी सर्व उपस्थित कवी, कवयित्री, व मान्यवरांचे संदीप पवार सर यांनी आभार मानून राष्ट्रगीताने संमेलनाची सांगता झाली. या प्रसंगी कवी संजीवकुमार धुमाळे यांनी पुस्तकाच्या हॉटेलच्या सौ. भीमाबाई जोंधळे आजीबाईना पुस्तके भेट दिली पुस्तकाच्या हॉटेलमध्ये ठेवण्यासाठी .

# बीडमध्ये राजकीय पुढाऱ्यांच्या बॅनरवर गुन्हेगारांचा फोटो झळकल्यास होणार कारवाई.!

बीड प्रतिनिधी : सार्वजनिक ठिकाणी गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तीचे होर्डिंग वर फोटो लावल्यास कार्यवाहीचे आदेश जिल्हाधिकारी यांनी दिले आहेत. काही दिवसांपूर्वी बीडमध्ये सरपंच देशमुख हत्या प्रकरण आणि सरपंच बापू आंधळे खून प्रकरणातील आरोपींचे फोटो मुख्य चौकातील बॅनरवर झळकले होते. तर पालकमंत्री अजित पवार यांच्या दौऱ्यादरम्यान अनधिकृत बॅनरचा विळखा देखील पाहायला मिळाला होता. दोन तीन दिवसाखाली बीड दौरा केला होता तेव्हा अजित दादांनी अधिकाऱ्यांची कान उघडणी केली होती. याची गंभीर दखल घेत जिल्हाधिकाऱ्यांनी यापुढे सार्वजनिक ठिकाणी गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तीचे होर्डिंग वर फोटो लावल्यास कार्यवाहीचे आदेश दिले आहेत.

या होर्डिंगची राज्यभर चर्चा देखील झाली होती. माध्यमांमध्ये बातम्या आल्यानंतर प्रशासनाने काही बॅनरवर कारवाई केली मात्र तोपर्यंत प्रशासन झोपले होते का? असा सवाल नागरिकांतून उपस्थित करण्यात आला. त्यानंतरबीडचे कलेक्टर ॲक्शन मोडवर आलेले दिसलें आहेत. बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा येणार असल्याने कार्यकर्त्यांची बॅनरबाजी दिसली होती.





त्यावेळी अजितदादांच्या बॅनरसाठी शेकापच्या माध्यमातून लावण्यात आलेले बॅनर्स काढण्यात आल्याने. संतप्त कार्यकर्त्यांनी अजितदादांच्या गाड्यांचा ताफा अडविण्याचा इशारा देखील दिला होता. ही गोस्ट लक्षात घेता अजितदादांनी



अधिकाऱ्यांची कान उघडणी केली होती. जिल्हाधिकाऱ्यांना सूचना केल्या आणि जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी अजित दादांच्या 15 ऑगस्टच्या दौऱ्यापूर्वी आदेश काढून कोणत्याही सार्वजनिक फलकावरील मजकूर पक्षेपाह नसावा, गुन्हेगार व गुन्हेगारीचे उदात्तीकरण करणारे, गुन्हेगारांचे फोटो त्यावर नसावेत असा आदेशच काढला आहे.

# नागनाथ देवस्थान मानूर येथे कावड यात्रा उत्साहात संपन्न ४ युवकांनी काशी विश्वनाथ येथून आणली कावड

बीड जिल्ह्यातील शिरूर कासार तालुक्यात असलेले श्री तीर्थक्षेत्र नागनाथ देवस्थान जहागीरदार मठसंस्थान मानूर येथे सालाबाद प्रमाणे श्रावणी तिसरा सोमवार यात्रा निमित्त कावड यात्रा उत्सव उत्साहात संपन्न झाला. परंपरेनुसार नागनाथ देवस्थान मानूरचे मठाधिपती यांची पालखी मिरवणूक सकाळी ९.०० वा. नागनाथ देवस्थानाच्या मुख्य प्रवेशद्वारापासून निघाली व उत्तरेकडील वेशीपर्यंत जाऊन थांबली. तिथे प्रचंड दूरचा म्हणजे १३५० किलोमीटर पायी प्रवास करून काशी विश्वनाथ (बणारस) येथून आलेल्या कावडी, घुश्नेश्वर संभाजीनगर



इथून आलेली कावड, नागतळा आणि पैठण येथून आलेल्या कावडी एकत्र झाल्या आणि भक्तिमय वातावरणातील प्रचंड ऊर्जेने मने प्रसन्न झाली. भव्य मिरवणूकीस वाजत गाजत सुरुवात होऊन दुपारी २.०० वा. नागनाथ मंदिर येथे येऊन ते पवित्र जल नागदेवतेच्या चरणी अर्पण करून अभिषेक संपन्न झाला. या यात्रा उत्सवासाठी सर्व तरुण युवकांमध्ये उत्स्फूर्त असा उत्साह दिसून आला. या यात्रेचे प्रमुख आकर्षण म्हणून कर्नाटक राज्यातून आलेले वीरभद्र अवतार घेतलेले पुरवंत लोक यांचे शस्त्राचे चित्त थरारक प्रात्यक्षिक पाहताना सर्व लोक भारावून गेल

## निगडी येथील शिवभूमी विद्यालयात पर्यावरण पूरक रक्षाबंधन सोहळा



निगडी येथील शिवभूमी विद्यालयात नेहमीच नाविन्यपूर्ण उपक्रम राबवले जातात यावर्षी कुंडी लागवड व वृक्षसंवर्धनाबरोबरच रक्षाबंधन सणाच्या निमित्ताने झाडाला राखी बांधून वृक्षसंवर्धनाचे महत्व शाळेतील कवयित्री, लेखिका, उपक्रमशील , तंत्रशिक्षिका कोठेकर योगिता यांनी विद्यार्थ्यांना पटवून दिले

श्रीम कोठेकर योगिता गेले तीस वर्ष निगडी येथील शिवभूमी विद्यालयात कार्यरत असून चांगले बालक घडविण्यासाठी त्यांचे विविध उपक्रम चालू असतात . काळाची गरज ओळखून विद्यार्थ्यांमध्ये झाडाचे महत्व रुजावे, वृक्ष आपले मित्र आहेत ही भावना दृढ व्हावी व प्रत्येकाने आपल्या परिसरात एक तरी झाड लावून त्याचे रक्षण संवर्धन करावे या हेतूने रक्षाबंधन सणाला विद्यार्थ्यांकडून राखी तयार करवून घेतल्या व शाळेतील वृक्षांना राखी बांधून हा सोहळा साजरा केला . विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरीत आनंद या उपक्रमाची यशस्विता सांगून गेला .



अंबाजोगाई ।प्रतिनिधी योगेश्वरी शिक्षण संस्था अंतर्गत निसर्ग संवर्धन मंडळाच्या वतीने स्वा.रा.ती.रुग्णालय परिसरातील दे.बा.ग.यो. नु.प्रा.विद्यालयात वृक्षारोपण करण्यात आले. दे.बा.ग.यो. नु.प्रा. विद्यालयात गोडसे, जेष्ठ शिक्षक व्यंकटेश चामनर, पर्यावरण विभाग प्रमुख रविंद्र ठाकुर,उपप्रमुख अशोक आखाडे,योगेश्वरी शिक्षण संस्था कर्मचारी पतसंस्थेचे कोषाध्यक्ष शिवहर ढगे,पल्लवी गंगणे,संध्या जोशी व अन्य शिक्षिका व विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत मोहगणी या वृक्षाचे वृक्षारोपण करण्यात आले.यावेळी विद्यार्थी,शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी श्रमदान केले.

# भव्य स्वागत व सत्कार

धम्म अचारण ग्रृप पुणे याचे स्वागत व समाजभुषण सुभाष बोराडे यांचा सत्कार तसेच पुणे येथून आलेल्या धम्म सहलीचे भव्य स्वागत व सत्कार संविधान ग्रृप संस्थापक अध्यक्ष राजन गायकवाड, मार्गदर्शक मिनाताई गांगुर्डे, संयोजक मिनाताई पाठक , समाजभूषण सुभाष बोराडे यांनी नासिकरोड येथे केले पुणे येथील धम्म अचारण ग्रृप हे संपुर्ण देश व महाराष्ट्रभर बौध्द धम्म व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जुन्या आठवणी लोणी ,सत्याग्रह भुमी ,विहारे अश्या विविध धम्म स्थळांना भेटी देतात व तेथील बौध्द धम्माचा व डॉ आंबेडकर विचारांच्या, आठवणीचा व ऐतिहासिक इतिहासाची माहिती संकलन करून त्याचा प्रचार व प्रसार करतात तर हा धम्म अचारण ग्रृपचे नासिक रोडला अगमान होताच संविधान कराओके ग्रृपचे संस्थापक अध्यक्ष राजन गायकवाड सरानी संपर्क साधला व नासिक पुणेरोड , नेहरू नगर बिग बाजर च्या शेजारी त्यांना चहा ,नाष्टा, देवून उपसकाचे स्वागत व सत्कार करण्यात आला यावेळी धम्म अचारण ग्रृपचे



संस्थापक श्री संतोष दिंपकर यांचा शाल व गुलाब पुष्प देवून सत्कार करण्यात आला नासिक मधील त्रिशरमी लेणी, काळाराम मंदिर सत्याग्रह भुमी ,व इतरही महत्वाचे धर्मस्थळे बघण्यासाठी आम्ही पुण्यावरून आलो आहे यावेळी धम्म आचारण ग्रृप पुणे संयोजक मा.संतोष दिंपकर व संविधान ग्रृपचे संस्थापक अध्यक्ष राजन गायकवाड सर, यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाज भुषण पुरस्कार प्राप्त महाराष्ट्र शासन श्री सुभाष पोपटराव बोराडे यांना शाल, गुलाब पुष्प देऊन सत्कार करण्यात आला यावेळी धम्म अचारण ग्रृपच्या सर्व पदाधिकारीचे गुलाब पुष्प देऊन सत्कार करण्यात आला.

# १५–ऑगस्ट रोजी जरांगे पाटील नांदेड दौऱ्यावर

## २९–ऑगस्ट रोजी आझाद मैदान मुंबई येथे होणाऱ्या आंदोलनाचा घेणार आढावा

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट नांदेड : मनोज जरांगे पाटील हे नुकतेच मराठवाडा दौऱ्यावर निघाले असून २९- ऑगस्ट च्या मुंबई येथिल आझाद मैदानावर होणाऱ्या ऐतिहासिक आंदोलनाच्या तयारीच्या अनुषंगाने मराठवाड्यासह संबंध महाराष्ट्र राज्यात विविध ठिकाणी चावडी बैठकीचे आयोजन मोठ्या प्रमाणात केले जात आहे. नांदेड जिल्ह्यात देखील गावा गावात, सर्कल, तालुका, प्रत्येक विधानसभा क्षेत्रात चावडी बैठकी पार पडत आहेत. नांदेड जिल्हा हा चळवळी चा जिल्हा त्यातच मनोज जरांगे पाटील यांचा चाहता वर्ग जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे मुंबई साठी जाण्याची संख्या ही मोठी असणार त्याच अनुषंगाने नांदेड जिल्ह्यातील १६ तालुक्यांचा आढावा घेण्यासाठी जरांगे पाटील १५-ऑगस्ट रोजी नांदेड मध्ये शासकीय विश्रामगृह येथे सर्व समाजबांधवांच्या गाठी भेटी घेऊन आढाव घेणार आहेत. त्याच पार्श्वभूमीवर सकल मराठा समाज नांदेड यांची हनुमान मंदिर मंगल कार्यालय, विजय नगर नांदेड येथे नियोजन बैठक पार पडली व सदरील बैठकीत १५- ऑगस्ट ला नांदेड जिल्ह्यातील जरांगे पाटील यांच्या दौऱ्याचे चोख नियोजन करण्यासंदर्भात सविस्तर चर्चा करून






जबाबदाऱ्यांचे वाटप करण्यात आले.

मनोज जरांगे पाटील हे १४- ऑगस्ट रोजी लोहा मार्ग नांदेडला येतील रात्री मुक्कामाला शासकीय विश्रामगृह येथे पोहचून अराम करतील व १५- ऑगस्ट रोजी सकाळी ९ वाजता पासून ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत जिल्ह्यातील सर्व समाज बांधवांच्या गाठी भेटी घेतील. महिला भगिनीचा रक्षा बंधन कार्यक्रम,मराठा डॉक्टर्स यांचे मराठा मेडिकोज, मराठा वकील बांधव, शासकीय कर्मचारी, आत्महत्या ग्रस्त कुटुंबातील सदस्यांच्या भेटी व सर्व सामाजिक संघटनाचे विविध पदाधिकारी , समाजातील सर्व क्षेत्रातील बांधवांच्या भेटी घेऊन यांच्यासोबत सविस्तर चर्चा करीत, पत्रकार बांधवासोबत वार्तालाप करून १६ तालुक्यांचा आढावा घेण्यात येईल.१६-तालुक्यातील समाज बांधवांनी आपल्या तालुक्यातील गावातील आढावा घेऊन जरांगे पाटलाच्या भेटीस उपस्थित राहावे. सायंकाळी ६ वाजता अर्धापूर मार्गे हिंगोली कडे रवाना होतील. अशी माहिती बैठक घेऊन सर्व समाज बांधवांच्या उपस्थितीत मराठा सेवक श्याम पाटील वडजे यांनी दिली.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com